Estd;1962
3.52 CGPA
NAAC"A++''Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
**PHONE: EPABX-** 0091-0231-2609000 **Director Office:** 0231-2609068
On Exam .: Section: 0231-2609121 Fax : 0091-0231-2690655
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-416004 महाराष्ट्र
NAAC"A''Grade Website: E- mail : coe@ unishivaji.ac.in./ Oe-3 exam@ unishivaji.ac.in.

जा.क./शिवाजी वि./इतर परीक्षा 2/3/48 दि. 06/08/2021

प्रति,

1) मा. विभागप्रमुख/संचालक/समन्वयक
पदव्युत्तर अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2) मा. प्राचार्य / मा.संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षा घेण्याबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, कोव्हीड–19 चा प्रादूर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये शासन निर्देशानुसार विद्यार्थ्याच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अधिविभाग /संलग्नीत महाविद्यालयाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प या परीक्षा महाविद्यालय व अधिविभाग स्तरावर आयोजित करावी. सदरच्या परीक्षेचे विद्यार्थ्यांना देण्यात आलेले गुण संगणक प्रणालीत भरण्यात यावेत.
2. विहीत मुदतीत सदर प्रक्रिया राबविण्यात यावी. जेणेकरून सदर कोर्सचे निकाल जाहीर करताना सदर गुणांमुळे प्रक्रिया प्रलंबित राहू नये, याची दक्षता घेण्यात यावी. गुण भरताना अबसेंट विद्यार्थ्यांना अबसेंट करावे. तसेच प्रेझेंट विद्यार्थ्यांचे गुणदान करून सिस्टीममध्ये भरण्यात यावे. सदर गुण भरून निश्चित **(Confirm)** करण्यात यावेत याची नोंद घ्यावी.
3. **गुण भरण्यासाठी आवश्यक ती लिंक दि. 10 ऑगस्ट, 2021 ते दि. 15 सप्टेंबर, 2021 या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत असून,** सदरची हार्ड कॉपी संबंधित विभागात दि. 20 सप्टेंबर, 2021 पर्यत जमा करण्यात यावी.
4. विद्यापीठ अधिकार मंडळांच्या मान्यतेनुसार प्रात्यक्षिक परीक्षा /मौखिक परीक्षा विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयात न बोलविता तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मुभा संबंधित अधिविभागप्रमुख/संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देण्यात आलेली आहे.
5. कोविड –19 साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येवून तसेच विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित डोळयासमोर ठेवून परीक्षांची पध्दत अवलंबण्यात यावी.
6. विद्यार्थ्याच्या आरोग्यास बाधा येऊ नये, याकरिता परीक्षा घेण्यासाठी जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.
7. परीक्षार्थीची कोणतीही तक्रार विद्यापीठात प्राप्त होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता महाविद्यालय/अधिविभागाने घ्यावी.
8. प्रात्यक्षिक परीक्षेच्या तारखा सर्व संबंधित विद्यार्थी , शिक्षक व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

| प्रात्यक्षिक परीक्षा नियोजन करण्याचा व ऑनलाईन माहिती भरण्याचा कालावधी | प्रत जमा करण्याचा दिनांक |
|---|---|
| 10 – 08 – 2021 ते 15 – 09–2021 | 20–09–2021 |

कळावे.

आपला विश्वासू,

**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत – 1. आय.टी. सेल – माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी – उपरोक्तप्रमाणे प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षेचे गुण ऑनलाईन भरण्याकरीता लिंक उपलब्ध करून देण्यात यावी.**
2. परीक्षक नियुक्ती विभागास